सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४१०/४६५/४९२
ई-मेल – desk10@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: https://dte.maharashtra.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

क्रमांक:१०/पदविका प्रवेश २२-२३/ प्रविशित विद्यार्थी यादी/PostHSC/ ३४९ दि. 19 MAY 2023

**परिपत्रक**

**विषय: शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील बारावीनंतरच्या प्रथम वर्ष औषधनिर्माणशास्त्र, हॉटेल व्यवस्थापन व खाद्यपेय व्यवस्था तंत्रज्ञान आणि सरफेस कोटींग तंत्रज्ञान या पदविका अभ्यासक्रमांना प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या यादीस अंतिम मान्यता देणेबाबत**

शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील बारावीनंतरच्या प्रथम वर्ष हॉटेल व्यवस्थापन व खाद्यपेय व्यवस्था तंत्रज्ञान आणि सरफेस कोटींग तंत्रज्ञान या पदविका अभ्यासक्रमांच्या प्रवेशाचा अंतिम दि. १९/१०/२०२२ व प्रवेश डेटा अपलोड करण्याचा अंतिम दि. २०/१०/२०२२ असा निर्धारित करण्यात आलेला होता. तसेच बारावीनंतरच्या प्रथम वर्ष औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रमाच्या प्रवेशाचा अंतिम दि. १०/०१/२०२३ व प्रवेश डेटा अपलोड करण्याचा अंतिम दि. ११/०१/२०२३ असा निर्धारित करण्यात आलेला होता. त्यास अनुसरुन सर्व संबंधित संस्थांनी प्रवेश केलेले होते.

शासनाने घोषित केलेल्या नियमानुसार प्रवेश प्रवेशप्रक्रिया संपल्यानंतर, सर्व तांत्रिक पदविका शिक्षण संस्थांनी सक्षम प्राधिकारी यांचेकडे प्रवेश मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे. यास अनुसरुन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या यादीस मान्यता देणेबाबतची प्रक्रिया ऑनलाईन पद्धतीने करण्याच्या दृष्टीने शैक्षणिक वर्ष २०२२-२३ या वर्षी संबंधित प्रवेश प्रक्रियेच्या संकेतस्थळावर ऑनलाईन प्रणाली उपलब्ध करुन देण्यात आलेली होती. सदर ऑनलाईन प्रणालीचा वापर करुन विभागीय कार्यालय, तंत्रशिक्षण यांनी प्रवेशित विद्यार्थ्यांच्या यादीची पडताळणी केलेली असुन ती अंतिम मान्यतेकरिता ऑनलाईन पद्धतीने संचालनालयास त्यांच्या शिफारशींसह सादर केलेली आहे. सदर पडताळणी करताना प्रवेश मान्यतेसाठीच्या कॅप व संस्थास्तरावर प्रवेश देण्यात आलेल्या व राखीव कोटा असलेल्या अशा सर्व विद्यार्थ्यांची यादी, उमेदवारीचा प्रकार, आरक्षण, अर्हता इत्यादी तसेच संस्था स्तरावर प्रवेश दिलेल्या उमेदवारांच्या प्रवेशासाठीची आवश्यक कागदपत्रे इ. ची पडताळणी तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय यांनी केलेली आहे.

सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय यांनी नमुद केलेल्या शिफ़ारशींस अनुसरुन प्रवेश देण्यात आलेल्या विद्यार्थ्यांच्या यादीस अंतिम मान्यता देण्याच्या अनुषंगाने संस्थांच्या संबंधित प्रवेशप्रक्रियेच्या लॉगीनमध्ये संचालनालयाद्वारे प्रमाणपत्र (Certificate) उपलब्ध करुन देण्यात येत आहे. त्याचबरोबर संस्थांच्या लॉगीनमध्ये अभ्यासक्रमनिहाय अंतिम मान्यता देण्यात आलेल्या प्रवेशित विद्यार्थ्यांची यादी देखील उपलब्ध करुन देण्यात येत आहे [Institute-wise Candidate List (Proforma B)] याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

(डॉ. विनोद मोहितकर)
प्र. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत:

१. प्रणाली व्यवस्थापक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुख्य कार्यालय, मुंबई यांना पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी
२. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी